
# जादूची भांडी

(तामिळनाडूची लोककथा)

लेखिका : वायू नायडू, चित्रकार : मुग्धा शहा

अनुवाद : स्नेहलता दातार



aduchi Bhandi (Marathi)

प्रकाशक :
मिलिंद ल. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन
'धवलगिरी', ४३०-३१ शनिवार पेठ
पुणे ४११०३०

मुंबई ऑफिस : मोहन बिल्डिंग
१६२ ज. शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४

First published in India in 1997 in English as
*Magic Vessels* by Tulika Publishers
© 1997 Tulika Publishers, Chennai, India
First published in India in 2003 in Marathi as
*Jaduchi Bhandi* by Tulika Publishers
© 2003 Tulika Publishers, Chennai, India

ज्योत्स्ना प्रकाशनची पहिली आवृत्ती : २००९

मुद्रक : रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३०

**मूल्य तीस रुपये**

ISBN 978-81-7925-197-3

# जादूची भांडी

(तामिळनाडूची लोककथा)

लेखिका : वायु नायडू
चित्रकार : मुग्धा शहा
अनुवाद : स्नेहलता दातार



ज्योत्स्ना प्रकाशन




मुथू नि चेल्लम आपल्या अकरा मुलांसह एका वडाच्या झाडाखाली राहत होती. मुथू एक नाटककार होता. त्याने पुष्कळ नाटकं लिहिली होती. खेड्यांतल्या लोकांना त्याची नाटकं आवडत असत. त्यातून त्याला कधीकधी पैसेही मिळत, पण लगेच कुणी ना कुणी येऊन ते उसने मागून नेत असे.

चेल्लम खूप कष्ट करत होती. ती दुसऱ्यांच्या घरी स्वयंपाक व घरकाम करून तिच्या पोराबाळांच्या तोंडात दोन घास घालत होती. तिला नेहमी भविष्याची काळजी वाटत असे.

एकदा ती मुथूला म्हणाली, ''आपल्याला घर नाही. मुलं लहान आहेत तोपर्यंत असं झाडाखाली राहणं ठीक आहे. पण उद्या ती मोठी झाली की मग आपण काय करायचं?''

''आपल्याला घर कशाला हवंय? अगं, या वडाच्या झाडानं आपल्याला इतकी वर्षं किती छान सांभाळलं आहे! ते नेहमीच आपल्यावर छाया धरेल. चिंता करू नकोस!'' असं म्हणून मुथू परत लिहायला बसला.

पण चेल्लमची चिंता कमी होत नव्हती. एके दिवशी सकाळी चेल्लमने रात्रीचा शिळा भात कालवला. तो एका लहान भांड्यात भरला. फडक्यात ते भांडं बांधलं आणि नवऱ्याजवळ दिलं.






ती म्हणाली, ''ही घ्या शिदोरी. तुम्ही काहीतरी कामधंदा शोधून पैसे कमवून आणाल, असं मला वचन द्या.''

''बरं, मी निश्चित प्रयत्न करेन.'' चेल्लमचे कष्ट त्याला पाहवत नव्हते म्हणून तोही तयार झाला.

मुथू जंगलात गेला. हवा छान पडली होती. हिरव्या वेलींवर शेंदरी फुलपाखरं उडत होती. मधमाश्या गूं गूं करत होत्या. कोकिळा दूर कुहूकुहू करत होती. कोवळे सूर्यकिरण झाडांवर पसरले होते. तो स्वतःशी म्हणाला, 'किती सुरेख आहेत हे सोनेरी किरण, मला जर हे हातात पकडता आले तर!' पानांमधून नाचणारा सूर्यप्रकाश हाताच्या ओंजळीत पकडण्याचा तो प्रयत्न करू लागला.

थोड्या वेळाने तो पुढे निघाला. चालतचालत तो जंगलात बराच आत गेला. पुढे त्याला रस्ता कळत नव्हता. कुठूनही गेलं तरी तो शेवटी एकाच जागी येत होता. सगळी झाडं एकसारखी होती, नि सगळ्या वाटाही एकसारख्याच दिसत होत्या. तो खूप दमला नि एका झाडाखाली बसला. बसल्याबसल्याच त्याला झोप लागली. त्याने आपल्याबरोबर आणलेलं भांडं शेजारीच ठेवलं होतं.





या झाडावर छोटी भुतं राहत होती. त्यांनी मुथूला पाहिल्यावर ती फांद्यांवरून तरंगत खाली आली. ती खिदळत व बडबडत होती.

"ते बघ काय आहे!" एका भुताने त्या भांड्याकडे बोट दाखवलं. त्यांनी ते फडक्यात बांधलेलं भांडं उघडलं. शिळा, आंबूस वास त्यांच्या नाकात शिरला.

त्या भुतांना इडली, मसाला डोसा, सांबार, म्हैसूरपाक असे पदार्थ माहीत होते, पण हा पदार्थ काही वेगळाच होता. त्या सर्वांनी मिळून ते भांडं चाटून पुसून रिकामं केलं.

थोड्या वेळानं मुथू उठला. आता त्याला भूक लागली होती. त्याचं लक्ष भांड्याकडे गेलं, पण ते तर अगदी रिकामं होतं. "अरेच्या! आता मी काय करू?" तो कळवळून ओरडला. त्याच वेळी पायापाशी त्याला काहीतरी चकचकीत, सोनेरी वस्तू दिसली. "हे काय आहे बरं?" असं म्हणत त्याने ती वस्तू उचलली. ते एक लहानसं पितळी भांडं होतं. "हे भांडं भरून जरी मला काही खायला मिळालं तरी पुरे!"






ताबडतोब झाडावरून भुतं खाली उतरली. त्यांनी मुथूसमोर केळीचं पान मांडलं. एका भुतानं लोणचं वाढलं, दुसऱ्यानं चटणी, नंतर गरम भात व तूप, त्यावर सोनेरी बदामी सांबार एकाने भातावर ओतलं. त्याचा छान वास सुटला होता. ''जेव ना मित्रा!'' ती भुतं म्हणाली. मुथू खाऊ लागला.

''जेवण फार छान आहे!'' बोटं चाटत मुथू म्हणाला. त्याने वर पाहिलं पण तोपर्यंत ती भुतं अदृश्य झाली होती.

मुथूने भांड्याकडे बघितलं. ''ते भांडं तुझ्यासाठी आहे. ते जादूचं भांडं आहे,'' झाडावरून आवाज आला. ''अरे वा! अरण्यातल्या दयाळू आत्म्यांनो, धन्यवाद!'' मुथूने त्यांचे आभार मानले आणि घाईघाईने तो घरी निघाला.

संध्याकाळ झाली होती. त्याची मुलं भुकेनं रडत होती. मुथूने ते भांडं झाडाखाली ठेवलं. त्याने दिवा लावला, हात जोडले आणि म्हणाला, ''माझी बायको व मुलं यांना आज पोटभर जेवण मिळू दे.''


वडाच्या झाडाच्या पारंब्यांमधून काही भुतं खाली उतरली.





त्यांनी मुलांचं अंग चोळून धुतलं. त्यांच्या केसांना तेल लावलं आणि त्यांना नवे कपडे घालायला दिले. नंतर त्यांनी मुलांना भरवलं. मुलांनी इतकं भरपूर खाल्लं की बसल्याजागीच ती झोपून गेली.

पूर्वी अनेकांनी मुथू व चेल्लम यांना अन्न देऊन मदत केली होती. त्यांनी दुसऱ्या दिवशी त्या सर्वांना जेवायला बोलावलं. गावकरी एकमेकांना म्हणत होते, ''आपण एका गरिबाकडे जेवायला जाणार आहोत, तेव्हा घरी खाऊन गेलेलं बरं.''



पण काय आश्चर्य! ती मेजवानी श्रीमंतांनाही हेवा वाटेल अशी होती. भाताचे वेगवेगळे प्रकार, स्वादिष्ट भाज्या, हर तऱ्हेचे पापड, लोणची, विविध प्रकारची पक्वान्नं असे पदार्थ भुतांनी बनवले होते.

काही जणांनी आपल्या साडीच्या किंवा धोतराच्या निऱ्यांत मिठाई लपवून न्यायचा प्रयत्न केला, तेव्हा त्या भुतांनी त्यांचा हात धरला. ''जे काही खायचं, ते इथेच खायचं!'' ती भुतं म्हणाली.


त्यानंतर मुथू नि चेल्लमबद्दल गावात खूप दिवस चर्चा होत राहिली.

त्या गावात कुप्पुस्वामी नावाचा एक श्रीमंत व्यापारी राहत होता. मुथूने त्याच्या घरी अनेकवेळा नाटकाचे प्रयोग केले होते. पण एकदाही कधी मुथूला, वा त्याच्या मित्रांना, कुप्पुस्वामीने पैसे किंवा भोजन दिलं नव्हतं.

मुथूचे नशीब फळफळलेलं पाहून कुप्पुस्वामीला त्याचा हेवा वाटायला लागला. आपल्याकडेही असंच एखादं जादूचं भांडं असावं असं त्याला वाटू लागलं.

त्याच्या मनात आलं, 'मीसुद्धा एक मोठं पातेलं भरून लिंबाचा भात या अरण्यातल्या भुतांसाठी घेऊन जाईन म्हणजे ते मला तसंच दुसरं मोठं जादूचं भांडं परत देतील.' मनात आल्याबरोबर बैलगाडीतून तो निघालासुद्धा.

तो त्या वनराईजवळ आला आणि गोलगोल फिरत राहिला; अगदी मुथू सारखाच. अचानक त्याला ओढ्याच्या पाण्याचा मधुर आवाज ऐकू आला. आता या ठिकाणी आपण झोपायचं नाटक करू या, असा विचार करून तो आडवा झाला. लवकरच तो घोरायलाही लागला.







काय चाललंय ते ती भुतं झाडावरून बघत होती. त्यांनी एकमेकांना खुणा केल्या. लिंबाच्या भाताची रास बघितली आणि ते मिस्किलपणे हसू लागले.

कुप्पुस्वामीला जाग आली तेव्हा त्याच्यासमोर एक उरुळी नावाचं मोठं भांडं होतं. ''वा वा, माझ्यासारख्या श्रीमंत माणसासाठी मोठं भांडं!'' तो म्हणाला.

ती उरुळी खूपच जड होती. ती उचलून बैलगाडीत ठेवताना त्याला खूप त्रास झाला. त्याने कशीबशी ती गाडीत ठेवली. गाडी ओढताना बैलदेखील कुरकुरत होता. कारण त्याला तो व्यापारी आणि त्याला मिळालेलं ते नवं अवजड भांडं उन्हातान्हातून ओढत न्यायचं होतं.







घरी पोचल्यावर कुप्पुस्वामीने एक दवंडीवाला गावात पाठवला. त्याने दवंडी पिटली, "ऐका हो ऐकाऽऽ उद्या कुप्पुस्वामींच्या घरी मेजवानी आयोजित केली आहे. मेजवानीला सर्वांनी या. न याल तर पस्तावाल!..."

गावकरी एकमेकांना म्हणू लागले, "त्या गरिबाच्या घरचं जेवण इतकं चविष्ट होतं, या श्रीमंताकडे तर जास्तच चांगलं असेल! हंऽऽ! आज उपास केला पाहिजे, म्हणजे उद्या यथेच्छ खाता येईल."

दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांनी नवीन कपडे घातले आणि सारे त्या व्यापाऱ्याच्या घराबाहेर जमले. सगळ्यांना खूप भूक लागली होती.






जादूचं मोठं भांडं घराबाहेरच होतं. सर्वांना पाहून त्या श्रीमंत व्यापाऱ्यानं एकदा खाकरून घसा साफ केला आणि म्हटलं, ''आजची मेजवानी आमचे पाहुणे जन्मात विसरणार नाहीत!''

त्याचे हे शब्द विरले नाहीत तोच ढूऽऽम असा आवाज आला आणि त्या भांड्यातून गोलमटोल प्राणी बाहेर पडू लागले. त्यांचे डोळे बटबटीत होते आणि त्यांना भीतीदायक मिश्या होत्या. त्यांनी पाहुण्यांच्या अंगावर उड्या मारायला सुरुवात केली.

खोडसाळपणे हसतहसत त्यांनी दंडुके फिरवले. ''हो तर! जन्मात विसरणार नाहीत अशी मेजवानी तुम्हांला हवी आहे ना? घ्या!'' आणि त्यांनी त्यांच्या हातातल्या काठ्या हवेत फिरवायला सुरुवात केली.

चकित झालेले लोक आरडाओरडा करत इकडेतिकडे पळू लागले.





''अरे जाऊ नका! जाऊ नका!'' कुप्पुस्वामी त्यांच्या मागून ओरडत होता. पण त्याचं ऐकतो कोण?


त्या रात्री मुथू आणि त्याचे कुटुंब वडाच्या झाडासमोर वर्तुळ करून बसले. चेल्लमने दिवा लावला आणि सगळ्या मुलांनी दिव्याला नमस्कार केला.

''दयाळू आत्म्यांनो, तुम्हांला मनापासून धन्यवाद!'' चेल्लम म्हणाली, ''हे जादूचं भांडं दिल्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत. आता यापुढे कुणी उपाशी राहणार नाही.''

वाऱ्याने जुन्या वडाची पानं सळसळली. त्या झुळकेबरोबर जणू काही वारा एक नवं गाणंच गात होता. मुथू चेल्लमकडे बघून हसला व म्हणाला, ''आपले झाडांमधले मित्र आपल्यासाठी गात आहेत. चला आपणही त्यांच्याबरोबर गाऊ या.'' आणि ते सर्व जण मिळून गाऊ लागले.








जादूची भांडी ही तामिळनाडूमधली लोककथा आहे.
मुथू हा झाडाखाली राहणारा एक गरीब नाटककार.
कामाच्या शोधात जंगलातून जात असताना
अचानक एक चमत्कार घडतो आणि त्याचे दिवस पालटतात...

तामिळनाडूमधल्या प्रत्येक गावात गावाचं रक्षण करणारे मातीचे पुतळे दिसतात. हे पुतळे अय्यनार नावाच्या शूर लढवय्याचे आणि त्याचे स्नेही व प्राणिमित्र यांचे असतात. त्यांचे डोळे खूप मोठे असतात आणि रंग भडक असतात. अय्यनारचे मातीचे घोडे हे जगातलं सर्वांत मोठं मातीचं मूर्तीकाम आहे. या पुस्तकातली चित्रं त्या पद्धतीने काढली आहेत.



ज्योत्स्ना प्रकाशन
'धवलगिरी', ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
मोहन बिल्डिंग, १६२ ज. शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४
www.jyotsnaprakashan.com

9788179251973